


WWJMRD 2019; 5(11): 96-97
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''पवित्रशास्त्र आणि त्याच्या परिणाम:-भाग-२''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
Christian literature is giving way to various Christian doctrines. For example, faith, hope, love. Many literatures have been written in the world on the above topics of Christian literature. Therefore, there are many good things on which Christian literature is based. As much as Christian literature is based on faith, hope and love, it is also based on pure command, pure fear, and God's judgment of truth. The basis and theme of Christian literature should be only God and His work. Kingdom-preaching work would accelerate, and to a lesser extent, through Christian literature, in the last century.

**Keywords:** God, Christian, Commandments, Jehovah, Holy Spirit, Knowledge, Moses, Faith, Judgments, Fear

**प्रस्तावना:**
ख्रिस्ती साहित्य हे वेगवेगळ्या ख्रिस्ती धर्मतत्वांवर आपले मार्ग प्रस्थ करीत जात असते.उदाहरणार्थ विश्वास,आशा,प्रीती ख्रिस्ती साहित्याच्या वरील विषयांवर जगात अनेक साहित्य लिहिले गेलेले आहे.निवडक ख्रिस्तीतेर लोक साक्ष देतात "ख्रिस्ती धर्म हा प्रीतीच्या कड्यावर उभा आहे." त्यामुळे अशा अनेक चांगल्या गोष्टी आहेत ज्यावर ख्रिस्ती साहित्य उभे आहे.ख्रिस्ती साहित्य जेवढ्या मोठ्या प्रमाणात विश्वास,आशा,प्रीती यावर उभे आहे तेवढेच हे साहित्य शुद्ध आज्ञा,निर्मल भय,आणि देवाचे सत्यतेचे निर्णय या घटकांवर देखील उभे आहे.

**यहोवाची आज्ञा शुद्ध आहे.ती डोळे प्रकाशविणारी आहे:-**
देवाने इस्राएल लोकांना दहा आज्ञा दिल्या यासाठी त्यांनी देवाशी एकनिष्ठ राहावे आणि आपल्या जीवनातून देवाची महिमा करावी.या दहा आज्ञा पहिल्या वेळेस देवाने मोशेला स्वतःच्या अंगठीने दगडावर लिहून/कोरून दिल्या.नंतर इस्राएली लोकांनी पाप केले आणि मोशने ते दहा आज्ञा तोडून टाकल्या.दुसऱ्या वेळेस जेव्हा देवाने दहा आज्ञा दिल्या तेव्हा मोशेला सांगितले आता तू लिही मी तुला सांगतो.सांगायचा मुद्धा देवाचे वचन हे आज्ञा पाळल्याने पूर्ण होते आणि त्यातून तुम्ही आत्मिक बनतात आणि तुम्ही पापाचा तिटकारा करतात.देवाची आज्ञा इतकी शुद्ध आहे की? ती तुमचे डोळे तेजोमय आणि प्रकाशित करते.नियमशास्त्र आणि त्याच्या आज्ञेत दहा आज्ञा प्रथम आणि सर्वोच होत्या त्याचे हनन मोशेला सहन झाले नाही.आज्ञा मोडणे म्हणजे अशुद्धता आणि अंधारात चालणे होय.ख्रिस्ती साहित्य देखील अशुद्धता आणि अंधार दूर करणारे साहित्य असायला हवे.त्यातून देवाची आज्ञा आणि महिमा प्रकट व्हायला हवी.

**यहोवाचे भय निर्मळ आहे.ते सर्वकाळ टिकणारे आहे:-**
देवाचे भय,किती गहन विषय आहे.नितीसुत्रे ९:-१० मध्ये लिहिले आहे "परमेश्वराचे भय ज्ञानाचा उगम आहे, आणि परमपवित्र देवाला ओळखणे हीच सुज्ञता आहे." देवाचे भय ज्ञानाचा उगम आहे.ख्रिस्ती साहित्य अज्ञानाने लिहिले जाऊ शकत नाही.ख्रिस्ती लेखक हा ज्ञानाने परिपूर्ण असला पाहिजे.आणि हे ज्ञान त्याला देवाचे भय ठेवल्यानेच मिळू शकते.त्यामुळे ख्रिस्ती साहित्य निर्मिती हे देवाचा भय ठेवल्याने होत असते.कारण त्यामुळे ज्ञान, बुद्धी,समज प्राप्त होते.तसेच ख्रिस्ती लेखक हा देवाला ओळखणारा असला पाहिजे.तेव्हाच त्याला समज हा गुण प्राप्त होतो.पवित्र आत्मा ही एक व्यक्ती आहे.ख्रिस्ती लेखकाने पवित्र आत्म्याच्या आवाज संपूर्णपणे ऐकणे गरजेचे आहे.कारण त्या माध्यमातूनच त्याचे आत्मिक संबंध पवित्र आत्म्याशी दृढ होत जातात.परिणामतः त्याला आत्मिक शब्दसाठा

संपूर्णपणे ऐकणे गरजेचे आहे.कारण त्या माध्यमातूनच त्याचे आत्मिक संबंध पवित्र आत्म्याशी दृढ होत जातात.परिणामतः त्याला आत्मिक शब्दसाठा भरभरून मिळतो,आणि तो ख्रिस्ती साहित्य लेखन आत्मिकरित्या करण्यास तत्पर बनतो.त्यामुळे देवाचे भय ठेवणे अत्यंत महत्वपूर्ण आहे. ख्रिस्ती व्यक्ती पापापासून परावृत्त होत जातो आणि पवित्रशास्त्र आणि त्याच्या ज्ञानात तो वाढत जातो.

**यहोवाचे निर्णय सत्य आहेत.ते सर्वस्वी न्यायी आहेत.:-**

देवाचे निर्णय सत्य आहेत.मनुष्य कोण आहे?जो देवाचा निर्णयावर आपला रोष व्यक्त करू शकतो.? कारण त्याचे निर्णय सत्य आहेत.आणि ते सर्वदा न्याय उत्पन्न करतात.देव कधीही पक्षपात करीत नाही.तो धर्मी आणि न्यायी आहे.ख्रिस्ती व्यक्तीने नेहेमी देवाच्या निर्णयावर आदर व्यक्त केला पाहिजे,ते मान्य केले पाहिजे.कारण आपणासाठीही त्याच्या योजना या उत्तम आणि चांगल्या आहे.ज्या योजना तारण प्राप्त करून देणाऱ्या आहे.ख्रिस्ती साहित्य देखील पक्षपातरहित असायला हवे,देवाच्या योजनेवर आधारित हवे,देवाच्या न्यायाच्या कसोटीवर उतरणारे हवे.तेव्हाच खऱ्या अर्थाने ते ख्रिस्ती साहित्य म्हटले जाईल.ख्रिस्ती साहित्याच्या आधार आणि विषय हा फक्त देव आणि त्याचे कार्य हवे.तेंव्हाच देवाच्या राज्याच्या सुवार्तेची गती वाढेल.आणि ही गती काही अंशी ख्रिस्ती साहित्याच्या माध्यमातून गेल्या शतकापासून वाढत आहे.

एक ख्रिस्ती लेखक म्हणून मी एकच प्रार्थना करतो."हे यहोवा माझ्या खडका,व माझ्या उद्धारका,माझ्या तोंडचे शब्द व माझ्या मनातले विचार तुझ्यापुढे मान्य असोत.आमेन."(स्रोतसंहिता:-१९-१४)

एक ख्रिस्ती लेखकाचा तोंडून निघणारे शब्द हे देवाकडून येत असतात.आणि ते त्याने खाल्ले पाहिजे,जसे यिर्मयाने केले.त्याच्या परिणाम तुम्ही जेव्हा ते शब्द बोलाल,शब्दबद्ध कराल,तेव्हा देवाचे अग्निमय सामर्थ्य तुम्हाला छेदून टाकेल आणि देवाच्या महिमेस ते कारणीभूत होईल.ख्रिस्ती साहित्य असा प्रकारे निर्मित होते त्यामुळे ख्रिस्ती साहित्यिकांनी देवाचे संपूर्ण मनोरथ पूर्ण करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची:-**

1. स्रोतसंहिता १९-वचन-७-१०.जुना करार.पवित्रशास्त्र